स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी.

(Doctor of Philosophy)

पदवीकरिता सादर करावयाचा संशोधन आराखडा

(Synopsis)

संशोधन विषय

“73 व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासींचे स्थान एक अभ्यास विशेष संदर्भ नांदेड जिल्हा(2014 ते 2024)”

संशोधक

रेणुका नामदेव खरोडे

(एम.ए.बी.एड, सेट)

मार्गदर्शक

प्रो. डॉ. डोंगरे एल. बी.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय हिमायतनगर,

जि. नांदेड

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज नांदेड

डिसेंबर - 2024

प्रस्तावना :-

भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची सर्वाधिक लोकसंख्या उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून असल्याचे दिसून येते. येथील 72 टक्के लोकसंख्या खेड्यात राहते. खेडी आत्मनिर्भर व समृद्ध बनविण्यात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. या संस्थांनी राजकीय शिक्षणाद्वारे लोकांच्या राजकीय जाणीवा, जागृती व सहभाग यातून नवनेतृत्व निर्मितीची प्रक्रिया गतिमान केली आहे. ऐतिहासिक दृष्ट्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्राचीन, मध्ययुगीन, आणि आधूनिक असे तीन कालखंड पडतात.

भारतात प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात व कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील लोक एकत्र येऊन गावातील समस्यांवर विचारविनिमय करीत त्यासाठी गावातील प्रौढ नागरिकांची सभा बोलावली जात असे. तिला ग्रामसभा म्हणत वैदिक काळातील ग्रामसभेचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. महाभारतातील शांतीपर्व जातक कथा, कौटिल्याचे अर्थशास्त्र, मॅगेस्थेनिसच्या इंडिका अशा ग्रंथामध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख आढळतो. यावरून ग्राम स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था असल्याचे दिसून येते. मौर्यकाळात ग्रामीण शासन संस्था अतिशय प्रगत होत्या त्या काळात ग्रामीण प्रशासन पूर्णतः शेतीशी संबंधित असे मौर्य यांनी स्वायत्त शासन प्रणाली प्रचलित करून शासनाचे विकेंद्रीकरण करण्याचे नीती अवलंबली होती. मध्ययुगीन काळात ग्राम प्रमुख ग्रामसभा आणि खेड्यातील इतर अधिकारी स्थानिक पातळीवर कार्यरत असल्याचे आढळते.

ब्रिटिश काळात स्थानिक स्वराज्य संस्थेत अमुलाग्र बदल झाला आणि इंग्रज काळात 1858 ते 1947 विद्यमान लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा उगम झाला. व्हाईसरॉय लॉर्ड रिपन यांनी 1882 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादित स्वरूपात स्वायत्तता दिली, जिल्हा लोकल बोर्ड सुरू करून खेड्यापर्यंत स्थानिक स्वराज्यची कल्पना प्रस्तुत केली. त्यानंतर ब्रिटिश सरकारने 1886 ते 1887 दरम्यान ठराव केले. पण त्यांची अंमलबजावणी झाली नाही. मात्र 1907 मध्ये रॉयल कमिशन ऑन डिसेंट्रलायझेशन नेमण्यात आले. या आयोगाने ग्रामपंचायती मजबूत करण्याची शिफारस केली. या शिफारशींना ब्रिटिश सरकारने 1815 व

1918 मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था विषयक ठराव सहमत केला. याशिवाय मॉन्टेग्यु चम्सफर्ड अहवालानुसार काही सूचना या संदर्भात देण्यात आल्या काही प्रांतातून व स्थानिक संस्थांच्या बाबतीत कायदे झाले. 1919 च्या सुधारणा कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचा टप्प्याटप्प्याने विकास घडवून आणण्याचे धोरण जाहीर झाले. सर्व प्रांतामध्ये ग्रामपंचायत जिल्हा बोर्ड, नगरपालिका, महानगरपालिका यासारख्या स्थानिक संस्था स्थापन झाल्या. मुंबई पंचायत 1920 कायद्याने मुंबई प्रांतात ग्रामपंचायतची स्थापना झाली. भारतातील पहिली महानगरपालिका 1687 मध्ये मद्रास आताची चेन्नई येथे स्थापना झाली.

भारतातील लोकशाही प्रणाली सुदृढ सक्षम व विकसित करण्याच्या उद्देशाने सरकारने कल्याणकारी शासन व्यवस्थेचा स्वीकार केला. या संकल्पनेत केंद्र शासन राज्य शासन आणि ग्रामपंचायत पासून महानगरा पर्यंतच्या स्थानिक शासन संस्था अशी त्रिस्तरीय राज्यकारभाराची व्यवस्था अभिप्रेत होती. त्या दृष्टिकोनातून तळागाळातील स्थानिक संस्थांना स्वातंत्र्य देण्यात आले. महात्मा गांधीजींना ग्रामाधिष्ठित लोकशाही निर्माण करावयाची होती. म्हणून महात्मा गांधीजींनी ग्राम स्वराज्य संकल्पनेचा पुरस्कार केला. त्यानुसार संविधानाच्या चौथ्या भागातील कलम 40 मध्ये ग्रामपंचयातीची तरतूद केली आहे. या तरतुदी नुसार गाव तिथे ग्रामपंचायत या तत्वाचा स्वीकार करण्यात आला.

भारतीय राज्यघटना निर्माण करताना शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय त्याचबरोबर वंचित आणि मागासलेल्या जनतेसाठी भारतीय संविधानात आरक्षणाची तरतूद केली आहे. संविधान किंवा राज्यघटनेत अनुच्छेद 330 (2) नुसार लोकसभेत लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जातीला 13 टक्के आणि अनुसूचित जमातीला 7 टक्के राखीव जागांची तरतूद केलेली आहे. घटक राज्याच्या विधानसभेत अनुच्छेद 332 (3) नुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थेत राखीव जागांची तरतूद केलेली आहे.

भारतीय संविधानात अनुसूची जमातीसाठी 5व्या अनुसूचित क्षेत्र व अनुसूचित जमातीचे प्रशासन यांची तरतूद केलेली आहे 6 व्या अनुसूचीत आदिवासी क्षेत्रे आणि त्यांचे प्रशासन यासाठी तरतूद केलेली आहे. आदिवासी जमात जंगल दऱ्याखोऱ्यात व डोंगराळ भागात राहणारी जमात आहे. भारत देश हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. भारत देशात जनता आजही जवळपास 72% खेड्यात राहत असताना दिसून येते. भारतामध्ये लोकशाही विकेंद्रीकरणाचा पाया हा इंग्रजांच्या 1935 च्या सुधारणा कायद्यानुसार दिसून येते. देशात लोकशाही विकेंद्रीकरणाची सुरुवात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचायतराज ची सुरुवात 1959 पासून राजस्थान मधील नागोर जिल्ह्यातून केलेली आहे. पंचायत राजच्या अंमलबजावणीसाठी विविध समित्या, आयोग गठीत केले होते.

बलवंतराय मेहता समिती

स्थापना: १६ जानेवारी १९५७

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशी:

1. संपूर्ण देशासाठी त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना करण्यात यावी.
2. गाव स्तरावर ग्रामपंचायत तालुकास्तरावर पंचायत समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद अशी यंत्रणा असावी.
3. ग्रामपंचायतीच्या कार्यात पाणीपुरवठा, स्वच्छ रस्ते, प्रकाश व्यवस्था आणि मागास जातीचे कल्याण यांचा समावेश करण्यात यावा.

वसंतराव नाईक समिती

स्थापना: २२ जून १९६०

वसंतराव नाईक समितीच्या शिफारशी:

1. महाराष्ट्रात त्रिस्तरीय पंचायत राज ची स्थापना करण्यात यावी.
2. 1000 हजार लोकसंख्येमागे एक ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावी.
3. स्थानिक स्वराज्य संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली एका सल्लागार समितीची स्थापना करण्यात येते.

<u>अशोक मेहता समिती</u>

स्थापना: १२ डिसेंबर १९७७.

अशोक मेहता समितीच्या शिफारशी:

1. पंचायत राजला घटनात्मक दर्जा देण्यात यावा.
2. जिल्हास्तरावरील विकासाची कामे जिल्हा परिषदेकडे सोपवावीत.
3. १५ ते २० हजार लोकसंख्येसाठी मंडळ पंचायतीची स्थापना करण्यात यावी.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रामध्ये ल. ना. बोंगिरवार समिती स्थापना २६ फेब्रुवारी १९७० डॉ. एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली १९८६ मध्ये एक समिती स्थापन केली या समितीने या संस्थांना घटनात्मक संरक्षण देण्याची शिफारस केली या समितीच्या शिफारशी वरून ६४ वे पंचायत राज्य घटना दुरुस्ती विधेयक चर्चेस येऊन संसदेने ते १० ऑगस्ट १९८९ रोजी सहमत केले.पण राज्यसभेने ते फेटाळले अखेर पी व्ही नरसिंहराव यांच्या कारकिर्दीत ते अंतिम स्वरूपात २३ डिसेंबर १९९२ ला सहमत झाले .

७३ वी घटना दुरुस्ती

या पार्श्वभूमीवर तत्कालीन पंतप्रधान श्री राजीव गांधी यांनी १५ मे १९८९ रोजी ६४ वे घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत मांडले. पंचायत राजच्या संदर्भात ६४ व्या घटनादुरुस्तीचे विधेयक १० ऑगस्ट १९९० रोजी लोकसभेत पारित झाले. पण राज्यसभेत नामंजूर झाल्यामुळे संविधान दुरुस्ती होऊ शकली नाही. त्यानंतर १९९१ मध्ये पी व्ही नरसिंहराव यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर पंचायत राज संस्था बाबत हेच विधेयक ७३ व्या घटना दुरुस्तीच्या रूपाने १६ सप्टेंबर १९९१ रोजी लोकसभेसमोर सादर केले. २२ डिसेंबर १९९२ रोजी जवळजवळ एकमताने ७३ व्या घटना दुरुस्तीचे विधेयक लोकसभेत मंजूर झाले. राज्यसभेने २३ डिसेंबर १९९२ रोजी मंजुरी दिली. १७ घटक राज्यांच्या विधिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपती ची यावर स्वाक्षरी झाली. २४ एप्रिल १९९३ पासून हा कायदा संपूर्ण भारतभर लागू करण्यात आला. यातून आदिवासी जमातीला राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली.

संशोधन विषयाची निवड:-

नांदेड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेत अनुसूचित जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील तालुक्यात प्रामुख्याने आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय आरक्षणामुळे आदिवासी जमातीला नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात व आर्थिक परिस्थितीत बदल घडवून येत आहेत. या बदलांचा व सक्षमीकरणाचा अभ्यास करण्यासाठी आदिवासी समाजाचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनात अभ्यास करण्यात येईल.

विषयाचे महत्त्व :-

प्रस्तुत संशोधनात ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासींचे स्थान एक अभ्यास विषय संदर्भ नांदेड जिल्हा २०१४ ते २०२४ या विषयाचा अभ्यास करण्यात येईल. स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये विकेंद्रीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. पंचायतराज मुळे स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकारणात सर्व समाज घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत गेलेले आहेत.

भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर 1959 पासून पंचायतराज निर्मिती होऊन ग्रामीण भागात राजकारणाची ओळख होत गेली. 1993 मध्ये 73 वी घटनादुरुस्ती होऊन ग्रामीण भागातील लोक राजकारणामध्ये सहभागी होताना दिसत आहेत. याच 73 व्या घटनादुरुस्ती मुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत जनता राजकारणामध्ये सहभागी झालेली आहे. यातच मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमात ही अतिदुर्गम व डोंगराळ भागात राहत आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट, हिमायतनगर, भोकर, हदगाव,अर्धापूर, माहूर या तालुक्यात आदिवासी जमात मोठ्या प्रमाणात अतिदुर्गम भागात राहत आहे. या जमातीचा राजकीय विकास झालेला नाही. म्हणून आदिवासी जमातीच्या राजकीय सहभागाच्या स्थानाचे अध्ययन करणे महत्त्वाचे आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेत 1993 मध्ये 73 व्या घटना दुरुस्तीने आदिवासी जमातीला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली. तरीही आदिवासी जमात राजकीय सहभागापासून खूप लांब असलेली दिसून येते. स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे उलटली तरीही आदिवासी जमातीचा राजकारणामध्ये व्हावा तेवढा सहभाग झालेला दिसून येत नाही.

आदिवासी जमातीचा शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक विकास झालेला नाही.म्हणून हा विषय अभ्यासणे आदिवासी जमातीसाठी उपयुक्त असणार आहे.

संशोधनाचा कालावधी व क्षेत्र :-

संशोधनाच्या विषयाचा प्रमुख उद्देश 73 व्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासींचे स्थान 2014 ते 2024 या 11 वर्षाच्या कालावधीतील नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमातीचा राजकीय सहभाग व त्यांचे स्थान या संबंधी अध्ययन करण्यात येईल. अध्ययन क्षेत्र हे नांदेड जिल्ह्यातील आदिवासी बहुल तालुके असतील.

उद्दिष्टे :-

1) स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी समाजाच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

2) स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी समाजाच्या स्थानिक नेतृत्वाचा अभ्यास करणे.

3) 73 व्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी जमातीच्या राजकीय प्रगल्भतेचा अभ्यास करणे.

4) नांदेड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करणे.

5) आदिवासी जमातीचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक,राजकीय विकास अभ्यासणे.

6) आदिवासी जमातीच्या राजकीय स्थानांचा अभ्यास करणे.

गृहीतके :-

1) स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी जमातीचा राजकीय सहभाग सक्रिय दिसून येत नाही.

2) स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी स्थानिक नेतृत्वाचा सक्रीय सहभाग दिसून येते नाही.

3) 73 व्या घटना दुरुस्तीनंतर आदिवासी जमातीत राजकीय प्रगल्भता दिसून येत नाही.

4) स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासी नेतृत्वाचे कार्य प्रभावशाली दिसून येत नाही.

5) आदिवासी जमातीचा सामाजिक आर्थिक राजकीय शैक्षणिक विकास पर्याप्त प्रमाणात झाल्याचे दिसून येत नाही.

6) आदिवासी जमातीचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय स्थान दुय्यम असल्याचे दिसून येते.

संशोधन समस्या :-

संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या 73 व्या घटनादुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेत आदिवासींचे स्थान एक अभ्यास विषय संदर्भ नांदेड जिल्हा 2014 ते 2024 आदिवासी जमातीच्या राजकीय सहभागाचा अभ्यास यावर जास्त लिखाण उपलब्ध नाही. या विषयाचा अभ्यास करताना मला गॅजेट, दैनिके, नियतकालिके, मासिके, संदर्भ ग्रंथ, ऐतिहासिक दस्ताऐवज इत्यादीचा मला आधार घ्यावा लागेल. मला ग्रामपंचायत पंचायत समिती आणि जिल्हा परिषदला भेटून मुलाखती घेऊन माहिती जमावीवी लागेल.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक, सांख्यिकीय आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवडीच्या प्रकारात गैरसंभाव्यता नमुना निवड अंतर्गत सहृहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल. त्यासाठी नांदेड जिल्ह्यातिल तालुक्यातील गावावर अभ्यास करण्यात येईल यासाठी २००० लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांची आणि १००० लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांची निवड करण्यात येईल.

तथ्य संकलन :-

प्रस्तुत संशोधनात विशिष्ट स्वरूपाची माहिती प्राप्त करून देण्याचे साहित्य म्हणजे तथ्य होय. संशोधनात तथ्य महत्वाची भूमिका बजावतात संशोधन समस्येशी संबंधित उचित आणि योग्य तथ्य संकलन करणे गरजेचे असते. कारण यावरच संशोधनाची यशस्वीता अवलंबून असते सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला विशेष महत्त्व प्राप्त होते. तथ्यांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. संशोधनाशी संबंधित विविध घटनांचे अध्ययन करून घटकासंबंधीच्या तथ्यांचे संकलन केले जाते. प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी दोन प्रकारच्या तथ्यांचा उपयोग करण्यात येईल.

1.प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत प्रश्नावली अनुसूची निरीक्षण, अवलोकन चर्चा व सर्वेक्षण या तंत्राचा अवलंब करण्यात येईल. नमुना दाखल स्थानिक स्वराज्य संस्थेतील अधिकारी पदाधिकारी आणि जनतेच्या मुलाखती घेण्यात येतील

2 दुय्यम स्त्रोत :-

द्वितीय स्त्रोत म्हणून विविध ग्रंथालयामध्ये उपलब्ध असणारे संदर्भ ग्रंथ, प्रकाशित,अप्रकाशित शोध प्रबंध,संशोधन साहित्य,ज्ञानकोश नियतकालिके शासकीय अहवाल,वृत्तपत्रे, साप्ताहिके,मासिके,राज्य शासनाकडून प्रसिद्ध होणारे शासकीय अहवाल,शासकीय संकेतस्थळे,इंटरनेट विविध पत्रके,ऐतिहासिक दस्ताऐवज,वार्षिकी आणि विविध शासकीय कार्यालयातून तसेच अन्य विश्वसनीय स्त्रोताकडून माहिती संकलित करण्यात येईल.

प्रकरणाची रूपरेषा :-

प्रस्तुत विषयाची एकूण सहा प्रकरणांमध्ये विभागणी केलेली आहे.ही मांडणी तथ्यांच्या व उद्दिष्टांच्या आधारे मांडणी केली आहे.

प्रकरण पहिले — प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर स्थानिक स्वराज्य संस्था ऐतिहासिक पार्श्वभूमी रचना कार्यपद्धती विविध समित्या व आयोगाचा आढावा विस्तृतपणे पहिल्या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे— संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचे महत्त्व उद्दिष्टे, गृहीतके,व्याप्ती,संशोधन पद्धती, तथ्य संकलन पूर्व संशोधन साहित्याचा आढावा इत्यादी बाबींचा विस्तृत आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे — अनुसूचित जमाती व घटनात्मक तरतुदी :

स्थानिक स्वराज्य संस्थेत अनुसूचित जमातीचा व अनुसूचित जमातीसाठी केलेल्या घटनात्मक तरतुदीचा व विषयाशी संबंधित घटनात्मक तरतुदीचा विस्तृत आढावा या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण चौथे— अनुसूचित जमातीचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय स्थान

स्थानिक स्वराज्य संस्थेत अनुसूचित जमातीच्या राजकीय सहभागाचा, त्यांच्या स्थानिक नेतृत्वाचा, अनुसूचित जमात राजकारणात किती सक्रिय आहे. याचा विस्तृत आढावा या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे— अनुसूचित जमातीचा सामाजिक राजकीय आर्थिक शैक्षणिक विकास

प्रस्तुत प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय विकासाचा विस्तृत आढावा घेण्यात येईल.

प्रकरण सहावे— निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणांमध्ये आदिवासी जमातीचा राजकीय सहभाग संशोधकांनी मांडलेली गृहीतके आणि संशोधनाअंती प्राप्त झालेली तथ्य यांची पडताळणी करून विषयाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून निष्कर्ष मांडले जाणार आहेत. तसेच आदिवासी जमातीच्या निवडणुका आरक्षण राजकीय सहभाग असलेल्या उद्दिष्ट पूर्तीसाठी आलेल्या अडचणी पूर्ण करण्यासाठी शिफारशी मांडल्या जाणार आहेत.

संदर्भसूची :-

1. विभुते भालंबा :- ग्रामपंचायत कामकाज पद्धती .
2. विळेगावे व्यंकट :- महाराष्ट्र शासन आणि जिल्हा प्रशासन.
3. भिसे तुकाराम :- “अंध जमात शोध आणि बोध” अनुराधा पब्लिकेशन,नांदेड (प्रकाशन 14 जानेवारी 2018)
4. शशिकांत अन्नदाते /स्वाती शेटे :-” अध्यापन संशोधन अभियोगिता” संपूर्ण मार्गदर्शक के सागर प्रकाशन 2017
5. धुमाळे विश्वनाथ :- अंध आदिवासी जमात : इतिहास व सांस्कृतिक वारसा, संपूर्ण प्रकाशन,पुणे- 41 (प्रकाशन 15 नोव्हेंबर 2016)
6. पाटील वा. भा :- ‘स्थानिक स्वराज्य संस्था’ प्रशांत प्रकाशन जळगाव .
7. डॉक्टर शांताराम भोसले :- ‘भारतातील स्थानिक शासन’ विद्या प्रकाशन नांदेड .
8. संजय खंडारे :- “पंचायत राज संस्था आणि विकासाच्या योजना” प्रकाशन अनुज,पब्लिकेशन, धनमंडी बाग, जुना बाजार,संभाजीनगर पिन कोड 431001
9. गोविंद यमलवाड :- “भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था” कल्पना प्रकाशन नांदेड

10 प्राध्यापक डॉक्टर राजेश धनजकर :-”अंध जमात : शोध आणि बोध”अनुराधा पब्लिकेशन सिडको नांदेड

11 गायकवाड टी एन :-’ महाराष्ट्रातील स्थानिक शासन’ स्वप्नाली प्रकाशन अहमदपूर

12 किशोर लवटे :- पंचायत राज किशोर लवटे पब्लिकेशन.

13 वर्तमानपत्रे :-

लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, सकाळ, पुढारी (मराठी भाषेतील वृत्तपत्रे)

संशोधक

रेणुका नामदेव खरोडे

(एम. ए., बी. एड, सेट)

मार्गदर्शक

प्रो. डॉ. डोंगरे एल.बी

(एम.ए, पीएच.डी,नेट)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय

हिमायतनगर, जि. नांदेड